महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९

ई-मेल- desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३ दिनांक : 21 SEP 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ४ ऑक्टोबर, २०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ६ सप्टेंबर, २०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यांत आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४-५-२०२० अन्वये करण्यांत आलेल्या उपाययोजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यांत आली नव्हती. तरी, सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यांत आली आहे, मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या लाभासाठी उमेदवाराच्या व त्याच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रु. ८.०० लाख इतकी करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या एका इंग्रजी व एका मराठी वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी **www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी आपल्या विभागीय कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यत) घेऊन येणार आहेत.

याबाबत संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करावे व त्यामधील तरतुदींबाबतची माहिती अवगत करुन उपरोक्त कालावधीमध्ये ऑन लाईन अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करावी. याकरीता आवश्यक लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्या कार्यालयास ई-मेल द्वारे कळविण्यात येईल. तसेच अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करण्यासाठी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, सूचना पत्रक, संदर्भीय शासन निर्णय व जाहिरातीची प्रत सोबत जोडलेली आहे.

आपणांस असेही कळविण्यांत येते की, आपल्या स्तरावर यासंबंधी एक पत्रकार परिषद आयोजित करण्यांत येऊन, या योजनेची माहिती देण्यांत यावी व याबाबतची बातमी सर्व स्थानिक वर्तमानपत्रातून तसेच रेडिओवरुन प्रसिध्द करण्यांत यावी. तसेच सदर योजनेचे पोस्टर तयार करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यांत यावे.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.
२. आपल्या कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईट वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३. आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच त्यांना त्यांच्या संस्थेंतर्गत संचलित सर्व वॉटसअप ग्रुप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात.
४. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, वरुन जाहिरात प्रसारित करावी.
५. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीत अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन **दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत** तंत्रशिक्षण संचालनालयास हस्तदेय जमा करण्याबाबत संबंधितांना आपले स्तरावरून स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

सहपत्रे :- वरीलप्रमाणे

आपला

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.

D:\Desk-19\Mali\Foreign Scholarship-2021-22\Foreign Scholarship-letter.doc